महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (मातं), निर्णय क्र. टाफोस्था-९३२६/प्र.क्र.३८/ मातं, दि. २५/०३/२०२६.

**विषय** :- अल्पवयीन मुलांमध्ये सामाजिक माध्यमांच्या वापराचा परिणाम व त्यावरील नियंत्रणात्मक उपाययोजना याबाबत शासनास शिफारस करण्याकरिता टास्कफोर्स स्थापन करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (मातं), निर्णय क्र. टाफोस्था-९३२६/प्र.क्र.३८/मातं, दि. २५/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२५१८५६५६०३०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 27-03-2026 15:28:20

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**अल्पवयीन मुलांमध्ये सामाजिक माध्यमांच्या वापराचा परिणाम व त्यावरील नियंत्रणात्मक उपाययोजना याबाबत शासनास शिफारस करण्याकरिता टास्कफोर्स स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (मातं),**
**शासन निर्णय क्रमांक : टाफोस्था-९३२६/प्र.क्र.३८/मातं**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २५ मार्च, २०२६

**प्रस्तावना :**

केंद्र सरकारच्या वित्त मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या अलीकडील आर्थिक सर्वेक्षणामध्ये अल्पवयीन मुलांमध्ये सामाजिक माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांविषयी गंभीर चिंता व्यक्त करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात १८ वर्षांखालील सुमारे ४ कोटी मुले असून, त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे.

भारतीय मानसोपचार संस्थेच्या अहवालानुसार १८ वर्षांखालील मुलांमध्ये मानसिक आजारांचे प्रमाण लक्षणीय वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करून आवश्यक धोरणात्मक उपाययोजना करण्याचे ठरविले आहे.

**शासन निर्णय :**

अल्पवयीन मुलांमध्ये सामाजिक माध्यमांच्या वापराचा परिणाम, त्यावरील नियंत्रणात्मक उपाययोजना व राज्यस्तरीय धोरण ठरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे तज्ज्ञ टास्कफोर्स स्थापन करण्यात येत आहे :

**१. टास्कफोर्सची रचना :**

| अ.क्र. | टास्कफोर्सची रचना | |
|---|---|---|
| १ | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | अध्यक्ष |
| २ | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, महिला व बालविकास विभाग | सह अध्यक्ष |
| ३ | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ४ | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव/सचिव, विधी व न्याय विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७ | असोसिएट डीन, कॉमर्स अन्ड मॅनेजमेंट, मुंबई विद्यापीठ | सदस्य |
| ८ | प्रिंसिपल, बॉम्बे स्कॉटीश स्कूल, मुंबई. | सदस्य |
| ९ | मराठी शाळेचे मुख्याध्यापक (१) | सदस्य |
| १० | या क्षेत्रातील नामांकित अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | Indian Psychiatric Society चे प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | सामाजिक माध्यम प्लॅटफॉर्म प्रतिनिधी (आमंत्रित) | सदस्य |
| १३ | संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय | सदस्य सचिव |

आवश्यकतेनुसार इतर तज्ज्ञांना विशेष निमंत्रित म्हणून सहभागी करून घेण्याचे अधिकार अध्यक्षांना राहतील.

**२. टास्कफोर्सची कार्यकक्षा (Terms of Reference) :**

**टास्कफोर्स खालील बाबींचा अभ्यास करेल :**

१. अल्पवयीन मुलांमधील सामाजिक माध्यम वापराचे स्वरूप व प्रमाण

२. अल्पवयीन मुलांच्या मानसिक आरोग्य, शारीरिक आरोग्य व वर्तनावर होणारे परिणाम

३. अल्पवयीन मुलांच्या शिक्षण, बौद्धिक विकास व सामाजिक कौशल्यांवरील प्रभाव

४. डिजिटल जाहिरातींचा अल्पवयीन मुलांवर होणारा परिणाम

५. सामाजिक व डिजिटल माध्यमांच्या नियमनासंबंधी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणांचा अभ्यास

६. ग्रामीण व शहरी भागातील परिस्थितीतील फरक

७. लिंगभेद, उत्पन्न गट व कौटुंबिक पार्श्वभूमीअनुसार परिणामांचे विश्लेषण

८. आवश्यक कायदेशीर, प्रशासकीय व तांत्रिक उपाययोजनांबाबत शिफारसी

९. महाराष्ट्र राज्यासाठी योग्य धोरणात्मक आराखडा सुचविणे.

**३. अहवाल सादरीकरण :**

टास्कफोर्सने स्थापना दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत आपला सविस्तर अहवाल व शिफारसी शासनास सादर कराव्यात.

**४. प्रशासकीय बाबी :**

टास्कफोर्सच्या बैठकींसाठी आवश्यक प्रशासकीय सहाय्य माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. आवश्यकतेनुसार अभ्यास, सर्वेक्षण किंवा तज्ज्ञ सल्ल्यासाठी समीतीस आवश्यक असलेल्या बाबींकरीता समीतीने स्वतंत्र प्रस्ताव शासनास सादर करावा.

टास्कफोर्स विहित कालावधीच्या आत वरील अभ्यासासह क्षेत्रीय स्तरावर भेट देवून आपला अहवाल शिफारशींसह शासनास सादर करेल. प्राप्त शिफारसींच्या आधारे शासनाकडून, मुलांचे संरक्षण तसेच शिक्षण, डिजिटल सक्षमीकरण व तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर अबाधित राहील, याबाबत पुढील आवश्यक निर्णय घेण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०२६०३२५१८५६५६०३०७ असा आहे. हा निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.03.25 18:58:35 +05'30'

**( दुर्गाप्रसाद मैलावरम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान/सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
११) शासनाचे सर्व मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई
१५) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१६) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१७) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१९) सर्व पोलीस आयुक्त

२०) सर्व विभागीय आयुक्त

२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य

२३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

२४) सर्व जिल्हाधिकारी

२५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

२६) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी

२७) संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई

२८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ

२९) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

३०) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख

३१) निवडनस्ती/मातं.